IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# बीड जिल्ह्यातील कृषी कर्ज पुरवठा थकबाकी - कारणे व उपाय

**डॉ. ढास डी. के.**
**अर्थशास्त्र विभागप्रमुख**
**प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय नेकनूर,ता. जि. बीड**

**सारांश :**

कृषी क्षेत्राला विविध बँकांच्या माध्यमातून पीक कर्ज व मुदत कर्जाचा पुरवठा करण्यात येतो. मात्र अनियमित पाउस, दुष्काळ, शेती साधनांच्या वाढत्या किंमती, पीक हमीभावाचा अभाव अशा अनेक कारणांमुळे शेतीमध्ये उत्पन्नाची शाश्वता राहत नाही. उत्पन्नाच्या अभावी व इतर कारणांमुळे शेतकरी कर्जाची योग्य वेळी परतफेड करू शकत नसल्यामुळे कृषी कर्जाची थकबाकी वाढते. बीड जिल्ह्यात देखील जवळजवळ ४७ टक्के कृषी पुरवठ्याची थकबाकी असल्याचे दिसून येते. शासनाकडून कृषी कर्ज माफी केले जात असले तरी पुन्हा कृषी कर्जाच्या थकबाकीत वाढ होत आहे. वाढत्या कृषी कर्ज थकबाकीचा बँक व शेती व्यवसायावर दुष्परिणाम होत आहे.

**मुख्य शब्द : कृषी कर्ज थकबाकी, थकबाकीचे कारणे व उपाय**

**प्रस्तावना**

बीड हा छत्रपती संभाजी नगर विभागातील एक जिल्हा आहे. बीड जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ८०.०९ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर १९.९१ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहत आहे. ग्रामीण लोकसंख्येपैकी २४.४७ टक्के शेतकरी व १४.६७ टक्के शेतमजूर तसेच इतर लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या कृषी व्यवसायावर अवलंबून आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यात कृषीक्षेत्राला विशेष महत्व आहे. कृषीक्षेत्राच्या विकासासाठी देखील भांडवलाची आवश्यकता असल्यामुळे कृषी कर्ज पुरवठ महत्वाचा आहे.

बीड जिल्ह्यात एकूण ११ तालुके असून आष्टी, पाटोदा, शिरूर (का.), बीड, केज व धारूर या ०६ तालुक्यात पावसाचे प्रमाण जिल्हयातील पावसाच्या सरासरी प्रमाणापेक्षा कमी तर गेवराई, माजलगाव, परळी, अंबाजोगाई व वडवणी या ०५ तालुक्यात पावसाचे प्रमाण जिल्ह्यातील सरासरी पेक्षा जास्त असते. बीड जिल्ह्यात बऱ्याच वेळा पावसाचे प्रमाण अनियमित असते त्यामुळे अधून-मधून दुष्काळी परिस्थिती निर्माण होते.

अनियमित पाउस, दुष्काळ, शेती साधनांच्या वाढत्या किंमती, पीक हमीभावाचा अभाव अशा अनेक कारणांमुळे शेतीमध्ये उत्पन्नाची शाश्वता राहत नाही. उत्पन्नाच्या अभावी व इतर कारणांमुळे शेतकरी कर्जाची योग्य वेळी परतफेड करू शकत नसल्यामुळे कृषी कर्जाची थकबाकी वाढते. बीड जिल्ह्यात देखील जवळजवळ ४७ टक्के कृषी पुरवठ्याची थकबाकी असल्याचे दिसून येते.

शासनाकडून कृषी कर्ज माफी केले जात असले तरी पुन्हा कृषी कर्जाच्या थकबाकीत वाढ होत आहे. वाढत्या थकबाकीचा बँक व शेती व्यवसायावर दुष्परिणाम होत आहे. सदर संशोधन लेखामध्ये बीड जिल्ह्यातील कृषी कर्ज पुरवठ्याची थकबाकी, थकबाकी राहण्याचे कारणे व थकबाकी कमी करण्यासाठी उपाय यांचा थोडक्यात अभ्यास करण्यात आला आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्टे :**

१. बीड जिल्ह्यातील कृषी कर्जपुरवठयाच्या थकबाकी स्थितीचा अभ्यास करणे.

२. बीड जिल्ह्यातील कृषी कर्जपुरवठयाच्या थकबाकीच्या कारणांचा अभ्यास करणे.

३. कृषी कर्जपुरवठयाची थकबाकी कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पद्धती :**

सदरचा संशोधन लेख लिहिण्यासाठी प्राथमिक व व्दितीय माहितीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करून बीड जिल्ह्यातील १०० शेतकऱ्यांकडून मुलाखत अनुसुचीच्या माध्यमातून माहिती संकलित केली आहे. व्दितीय माहिती प्राप्त करण्यासाठी विविध अहवाल, पुस्तके, संशोधन लेख व संकेतस्थळांचा वापर करण्यात आला आहे.

**विश्लेषण :**

थकबाकी ही कृषी कर्जाच्या संदर्भात भेडसावणारी सर्वात मोठी समस्या आहे. शेतीमध्ये उत्पन्नाची शाश्वता नसल्यामुळे शेतकरी कर्जाची योग्य वेळी परतफेड करू शकत नाहीत; त्यामुळे कृषी कर्जाची थकबाकी वाढते. बीड जिल्ह्यातील कर्जदार शेतकऱ्यांच्या कृषी कर्जाच्या थकबाकीचे प्रमाण खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. १**


**कृषी कर्ज थकबाकीची स्थिती**

| घटक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| थकबाकी नाही | ५३ | ४७.०० |
| थकबाकी आहे | ४७ | ५०.०० |
| एकूण | १०० | १००.०० |

स्रोत मुलाखत: अनुसूचीच्या आधारे

**आलेख क्र. १**

**कृषी कर्ज थकबाकीची स्थिती**




स्रोत: तक्ता क्र १ नुसार

आलेख क्र. १ मध्ये बीड जिल्ह्यातील कर्जदार शेतकऱ्यांची थकबाकीची स्थिती दर्शविण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील १०० कर्जदार शेतकऱ्यांपैकी ४७ टक्के शेतकरी थकबाकीदार आहेत तर ५३ टक्के शेतकरी हे थकबाकीदार नसल्याचे दिसून आले आहे. यावरून स्पष्ट होते की, बीड जिल्ह्यात थकबाकीदार शेतकऱ्यांचे प्रमाण फार जास्त आहे; एकूण शेतकऱ्यांपैकी ४७ टक्के शेतकरी थकबाकीदार आहेत तर फक्त ५३ टक्के शेतकरी थकबाकीदार नाहीत.

कृषी कर्जाची थकबाकी राहण्याचे अनेक कारणे आहेत. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या थकबाकीच्या कारणांचा अभ्यास खालील तक्त्यात करण्यात आला आहे.

**तक्ता क्र .२**

**थकबाकीची कारणे**

| थकबाकीचे कारण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| घेतलेल्या कर्जाचा अनुत्पादक कारणांसाठी वापर | १३ | १३.०० |
| जमीन नापीक होणे अथवा नैसर्गिक आपत्ती | ५९ | ५९.०० |
| सरकार कर्जमाफ करेल या अपेक्षेने | ०६ | ०६.०० |
| उत्पादित मालाला योग्य भाव न मिळणे | २२ | २२. ०० |
| **एकूण** | **१००** | **१००.००** |

स्रोत: मुलाखत अनुसूचीच्या आधारे

तक्ता क्र. २ मध्ये बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडे थकबाकी राहण्याच्या कारणांची माहिती दर्शविण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील ५९.०० टक्के शेतकरी जमीन नापीक होणे अथवा नैसर्गिक आपत्ती या कारणांमुळे थकबाकीदार राहत आहेत. त्या खालोखाल २२ टक्के शेतकरी उत्पादित मालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे, १३.०० टक्के शेतकरी घेतलेल्या

कर्जाचा अनुत्पादक कारणांसाठी वापर केल्यामुळे तर ०६.०० टक्के शेतकरी शासन कर्जमाफ करेल या अपेक्षेने कर्जाची परतफेड करत नसल्यामुळे त्यांच्याकडे थकबाकी राहत असल्याचे दिसून आले आहे.

वरील विश्लेषणावरून असा निष्कर्ष निघतो की, बीड जिल्ह्यातील सर्वात जास्त ५९.०० टक्के शेतकरी जमीन नापीक होणे अथवा नैसर्गिक आपत्ती या कारणांमुळे थकबाकीदार आहेत तर २२.०० टक्के शेतकरी उत्पादित मालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे थकबाकीदार आहेत. या व्यतिरिक्त १३.०० टक्के शेतकरी घेतलेल्या कर्जाचा अनुत्पादक कारणांसाठी वापर केल्यामुळे तर ६.०० टक्के शेतकरी सरकार कर्ज माफ करेल या अपेक्षेमुळे थकबाकीदार राहत आहेत.

सर्व राज्यात कृषी कर्जाच्या थकबाकीत वाढ होत आहे. थकबाकीत होणारी वाढ कमी करण्यासाठी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सूचित केलेल्या उपाययोजनांचा अभ्यास खालील तक्त्यात करण्यात आला आहे.

**तक्ता क्र. ३**

**थकबाकी कमी करण्यासाठी उपाय**

| उपाय | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| बँकांनी उत्पादक कारणासाठी कर्जाचा पुरवठा करावा व कर्ज वापरावर नियंत्रण | १९ | १९.०० |
| शेतकऱ्यांनी कर्जाचा योग्य कारणासाठी वापर करावा | १५ | १५.०० |
| उत्पादन होताच कर्जाचा हप्ता भरावा | १३ | १३.०० |
| परतफेड मानसिकता निर्माण करणे | १० | १०.०० |
| उत्पादित मालाला योग्य भाव न मिळणे | ४३ | ४३.०० |
| **एकूण** | **१००** | **१००.००** |

स्रोत: मुलाखत अनुसूची च्या आधारे

तक्ता क्र ३. मध्ये थकबाकी कमी करण्यासाठी काय उपाययोजना करणे आवश्यक आहे; याबाबत बीड जिल्ह्यातील १०० कर्जदार शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया घेण्यात आल्या आहेत. थकबाकी कमी करण्यासाठी काही उपाय बँकांनी तर काही उपाय शासनानी करणे आवश्यक आहे असे शेतकऱ्यांनी नमूद केले आहे. बीड जिल्ह्यातील कर्जदार शेतकऱ्यांपैकी १५ टक्के शेतकऱ्यांनी कर्जाचा योग्य कारणांसाठी वापर करावा असा उपाय सूचविला आहे तर १३ टक्के शेतकऱ्यांनी उत्पादन होताच कर्जाचा हप्ता भरणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्याचबरोबर १० शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांमध्ये परतफेड मानसिकता निर्माण करणे आवश्यक असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. थकबाकी कमी करण्यासाठी बँकांनी कोणते उपाय करावेत या संदर्भात बँकांनी उत्पादक कारणासाठी कर्जाचा पुरवठा करावा व कर्ज वापरावर नियंत्रण ठेवावे जेणेकरून शेतकरी कर्जाचा योग्य कारणासाठी वापर करतील असे मत १९ टक्के शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे. थकबाकी राहण्यामध्ये उत्पादित मालाला योग्य भाव न मिळणे हे कारण सर्वात महत्त्वाचे आहे; त्यामुळे थकबाकी कमी करण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून द्यावा अशी प्रतिक्रिया ४३ टक्के शेतकऱ्यांनी दिली असल्याचे दिसून आले आहे.

थोडक्यात शेतकऱ्यांनी कर्जाचा गैरवापर न करता योग्य कारणांसाठी कर्जाचा वापर करावा त्यामुळे उत्पादन प्राप्त होवून त्यामधून कर्जाची परतफेड करणे शक्य होईल. त्याचबरोबर उत्पादन होताच कर्जाचा हप्ता भरावा व कर्जाची परतफेड करण्याची मानसिकता ठेवणे आवश्यक आहे. बँकांनी देखील उत्पादक कारणासाठी कर्जाचा पुरवठा करावा व कर्ज वापरावर नियंत्रण ठेवावे व शासनाने शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला योग्य भाव मिळवून द्यावा या सर्व उपायामुळे कृषी कर्जाची थकबाकी कमी करणे शक्य होईल.

**निष्कर्ष व उपाय :**

बीड जिल्ह्यात थकबाकीदार शेतकऱ्यांचे प्रमाण फार जास्त आहे; एकूण शेतकऱ्यांपैकी ४७ टक्के शेतकरी थकबाकीदार आहेत तर फक्त ५३ टक्के शेतकऱ्यांकडे थकबाकीदार नाहीत. बीड जिल्ह्यातील सर्वात जास्त ५९.०० टक्के शेतकरी जमीन नापीक होणे अथवा नैसर्गिक आपत्ती या कारणांमुळे थकबाकीदार आहेत तर २२.०० टक्के शेतकरी उत्पादित मालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे थकबाकीदार आहेत. या व्यतिरिक्त १३.०० टक्के शेतकरी घेतलेल्या कर्जाचा अनुत्पादक कारणांसाठी वापर केल्यामुळे तर ६.०० टक्के शेतकरी सरकार कर्ज माफ करेल या अपेक्षेमुळे थकबाकीदार राहत आहेत.

कृषी कर्जाची थकबाकी कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी कर्जाचा गैरवापर न करता योग्य कारणांसाठी कर्जाचा वापर करावा त्यामुळे उत्पादन प्राप्त होवून त्यामधून कर्जाची परतफेड करणे शक्य होईल. त्याचबरोबर उत्पादन होताच कर्जाचा हप्ता भरावा व कर्जाची परतफेड करण्याची मानसिकता ठेवणे आवश्यक आहे. बँकांनी देखील उत्पादक कारणासाठी कर्जाचा पुरवठा करावा व कर्ज वापरावर नियंत्रण ठेवावे. शासनाने शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला योग्य भाव मिळवून द्यावा या सर्व उपायामुळे कृषी कर्जाची थकबाकी कमी करणे शक्य होईल.

**संदर्भ**

१. District Performance Report (2013), Lead Bank Beed, State Bank of India.

२. महाराष्ट्र शासन (२०१२), बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०११-१२, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, मुंबई

३. माडेकर ए. (२०११), बीड जिल्हा, अपर्णा प्रकाशन, बीड

४. Morusu,S.S.(2012), Rural Financial Institutions in India, Monthly Public Opinion Surveys, The Indian Institute of Public Opinion Pvt. Ltd., New Delhi.,(8)

५. कविमंडन व्ही. (२००६), कृषी अर्थशास्त्र, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

६. तायडे व्ही.व्ही. (२०११), ग्रामीण कर्ज बाजारीपणा,कृषी पणन मित्र, अंक-११

७. महाजन बी.जी. (जानेवारी २००७), कृषी कर्जमाफी: शोध आणि बोध, योजना, माहिती प्रसारण मंत्रालय, भारत सरकार,नवी मुंबई